# प्रकरण दुसरे

# महामानव श्रीकृष्ण

# प्रकरण दुसरे

## महामानव श्रीकृष्ण

### प्रास्ताविक --

व्यासांनी महाभारतामध्ये अनेक व्यक्तींची व्यक्तिचित्रे चित्रित केलेली आहेत. या सर्व व्यक्तिरेखांमध्ये श्रीकृष्णाची व्यक्तिरेखा मध्यवर्ती आहे. इतर सर्व व्यक्तिरेखांना श्रीकृष्ण या व्यक्तिरेखेचा आधार आहे. श्रीकृष्णाची व्यक्तिरेखा मध्यवर्ती असूनही तिचे नीटसे आकलन होत नाही. हे या व्यक्तिरेखेचे खास वैशिष्ट्य आहे. श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्वाची जी कक्षा नजरेसमोर येईल ती कक्षा रेखामय करून ते व्यक्तिमत्व समजावून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. विराट स्वरूप दर्शनामुळे श्रीकृष्णाची व्यक्तिरेखा अगम्य व अलौकिक बनलेली आहे. कितीही अक्कलेचे तारे तोडले तरी विराट स्वरूपामध्ये शिरताच येत नाही.

ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांनी आपल्या प्रतिभेने श्रीकृष्णाची व्यक्तिरेखा जीवंत केलेली आहे. मूळ गीतेतील श्रीकृष्णाच्या व्यक्तिरेखेचे चित्रात्मक असे चित्रण करून श्रीकृष्णाची व्यक्तिरेखा सजीव केलेली आहे. ज्ञानेश्वरीतील श्रीकृष्णाची व्यक्तिरेखा अलौकिक असूनही लौकिकतेचे दर्शन घडविते. श्रीकृष्णाच्या व्यक्तिरेखेतील लौकिक आणि अलौकिकतेच्या रेषा एकमेकात मिसळूनही एकमेकीपासून अलग होतात. जीवनामध्ये अनेक भूमिका उभ्या करणारा श्रीकृष्ण ज्ञानेश्वरीत अर्जुनाला प्रीती अलिंगन देऊन असा शिष्य लाभणे फार मोठे भाग्य समजतो. श्रीकृष्ण या व्यक्तिरेखेचे अभिनव असे दर्शन ज्ञानेश्वरीत घडते. गीतेतील कृष्ण गीतेतच राहतो तर ज्ञानदेवीतील श्रीकृष्ण गीतेतून ज्ञानदेवीच्या रथात बसून लोकमानसात उतरतो. साहित्याचा लोकमानसावर संस्कार होत असतो व लोकमानस घडविण्याचे काम

साहित्य करीत असते. ज्ञानदेवीतील श्रीकृष्ण लोकमानस घडवून लोकशिक्षणाचे कार्य करीत आहे.

श्रीकृष्णाचे जीवनचरित्र जन्मापासून तहत निजधामाला जाईपर्यन्त फारच चमत्कारिक आहे. अनेक कुलदीपकांना जन्म देऊनही आपला कुलदीपक टिकवता आला नाही ही दु:खाची किनार श्रीकृष्णाच्या जीवनचरित्राला आहे. तरीही श्रीकृष्ण पूर्णावस्थेला पोचलेला पूर्णपुरूष आहे. श्रीकृष्णाच्या जीवनामध्ये अनेक दु:खाचे क्षण आले तसेच आनंदाचे मेघही बरसले या सुख दु:खाना बरोबर घेऊन आनंदाचे गाणे गाणारा असा हा आनंदयात्री पुरूष आहे. जन्मच मरणाच्या अटीतटीत झाला जन्मत:च आईला विरहाचा चटका लावून गेला. यशोदेच्या घरी लहानबालकाच्या सर्व अवस्था पूर्णकरून मोठा झाला. यशोदेच्या घराचे व गोकुळाचे नंदनवन केले. गोपाळ व गोपिका यांना देता येईल तेवढे मित्रप्रेम देऊन शेवटी पांडवांचा रक्षण कर्ता म्हणून अमर राहिला.

महाभारतातील श्रीकृष्णाची व्यक्तिरेखा चैतन्यमयी आणि अमर पुरूष श्रेष्ठाची आहे" पुत्र, मित्र, बंधु, प्रियकर, योध्दा, पती, राजा, राजकारणपटु, वक्ता, तत्वज्ञ अशा साऱ्या भूमिका सारख्याच लीलेने पार पाडणारा कृष्ण हा खऱ्या अर्थाने महामानव असून महाभारतकालीन पूर्णपुरूषाची साकारप्रतिमा त्याच्या रूपाने चित्रार्पित झालेली दिसते. जीवनाच्या प्रत्येक अंगामध्ये स्वत:चे वैशिष्टय आणि नैपुण्य प्रकट करणारा कृष्ण हा अमर्याद पौरूषाची जिवंत प्रतिमा असून एका अर्थाने मर्यादापुरूषोत्तम रामाचे दुसरे टोक आहे. मृत्यूच्या अटीतटीत आणि भीतीच्या भोवऱ्यात झुंझावती जीवन जगणारा कृष्ण हा पौराणिक साहित्यातील चैतन्यमयी आणि अमर पुरूषश्रेष्ठ आहे.

आसक्ती आणि विरक्ती या दोहोंची परमावधी कृष्ण चरित्रामध्ये झालेली दिसते. या कारणानेच मानवी कर्तृत्वाचे सारे पैलू व्यापून उरणारा पूर्ण-पुरूष कृष्ण हा प्राचीन भारतीय साहित्यात अजरामर बनला आहे. भारतीय

सांस्कृतिक आदर्शाची चालती बोलती प्रतिमा म्हणजे कृष्ण असून भारताच्या सर्व भागात आजही या ना त्या स्वरूपात त्याची पूजा केली जाते. याचेही रहस्य हेच असावे.

भारतीय युध्दाच्या धुमश्चक्रीत पांडवाचा आणि त्यातही विशेषत: अर्जुनाचा गुरू ,मित्र आणि सहाय्यक या त्रिविध भूमिका कृष्णाने स्नेहवत्सलतेने पार पाडल्या प्रसंगी रणभूमीवर पांडवांच्या रथाच्या घोड्यांची सेवा करुन ऐन युध्दात त्यास याने पाणी पाजले ( म.द्रो.१७५.५५ )

कालपर्यन्त आपले गुरूजन,आप्तस्वकीय आणि बांधव म्हणून वावरलेले लोकच आज शत्रू म्हणून युध्दासाठी खडे झालेले पाहून धनुर्धर अर्जुन गोंधळला आणि युध्दभूमी सोडून जाण्याची भाषा करु लागला त्यावेळी कर्म करीत असतानाच कर्मबंधनापासून मुक्ती कशी प्राप्त करावी याची शिकवण देणारा अद्वितीय उपदेश याने अर्जुनाला केला.तोच भगवदगीता या नावाने सुविख्यात आहे ( म.भी.२३-४० ) भगवतगीतेच्या अकराव्या अध्यायात कृष्णाने अर्जुनास घडविलेल्या विश्वरूपाचे दर्शन सविस्तर वर्णन केलेले आहे. परमेश्वराच्या अनादी अनंत स्वरूपाचे एवढे रौद्रगंभीर वर्णन प्राचीन संस्कृत साहित्यात अन्यत्र क्वचितच आढळते.[१]

ज्ञानेश्वरीतील व्यक्तिरेखेचा अभ्यास पुढील प्रमाणे केलेला आहे.

श्रीकृष्णाची विवेकनिष्ठ दूरदृष्टी --

महाभारतामध्ये श्रीकृष्णाच्या विवेकनिष्ठ दूरदृष्टीचे दर्शन घडते.श्रीकृष्ण कोणताही निर्णय घाई गडबडीने घेत नाही. संपूर्ण परिस्थिती समजावून घेऊन विवेकनिष्ठ अशी कृती श्रीकृष्ण करतो. युध्दाच्यापूर्वी श्रीकृष्ण दुर्योधनासमोर अनेक शांततेच्या मार्गाचे पर्याय ठेवतो, स्वत: शिष्टाई करतो पण दुर्योधन आपली आग्रही भूमिका बदलत नाही. शांततेच्या मार्गाचे सर्व पर्याय संपल्यानंतर अपरिहार्य म्हणून श्रीकृष्ण युध्दाचा मार्ग स्वीकारतो. श्रीकृष्णाने पांडवांवर किंवा कौरवावर

युध्द लादलेले आहे असा आक्षेप कोणीही घेऊ शकत नाही. श्रीकृष्णाच्या विवेकनिष्ठ दूरदृष्टीचे हे उदाहरण आहे. श्रीकृष्णाच्या या विवेकनिष्ठ दूरदृष्टीचे दर्शन ज्ञानदेवीत घडविलेले आहे.

युध्द जिंकावयाच्या महत्वाकांक्षाने युध्दभूमीवर आलेला अर्जुन स्वजनांना पाहून मोहवंश होतो .पाप होईल कुलक्षय होईल, सर्वत्र अनाचार व स्वैराचार माजेल असे सांगून युध्द टाळण्याची भाषा करू लागतो.तेव्हा श्रीकृष्ण शांतपणे ऐकून घेतात.आश्चर्य चकित होतात .वर्षभर अभ्यास करुन एखादा विद्यार्थी परीक्षेस बसणार नाही म्हटल्यानंतर शिक्षकास व पालकास आश्चर्याचा धक्का बसावा तशी अवस्था श्रीकृष्णाची झाली. परंतु श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्वातील विवेक जागृत असल्याने ते चटकन अद्वातद्वा बोलत नाहीत किंवा अर्जुना तू युध्द केलेच पाहिजे असा हक्कही बजावत नाहीत. गीतेतील श्रीकृष्णाला विचार करायला वेळ मिळालेला नाही ते चटकन संवादालाच सुरुवात करतात.

ज्ञानेश्वरीत मात्र ज्ञानदेवानी आपल्या प्रतिभा सामर्थ्याने श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्वातील विवेकनिष्ठता व संयम या गुणवैशिष्ठ्यांचे ,श्रीकृष्ण मनातल्या मनात काय विचार करीत असावे या प्रसंगाने चित्रण केलेले आहे. ज्ञानदेव म्हणतात,

तव कृषमनी नावेक । विस्मौ जाहला ।
तो आपणाया आपण म्हणे । एथ कायी कपणा जाणे ।
हे मनी धरिले येणे । परि काही आश्चर्य असे
ऐसी पुढील से घेतु । तो सहजे जाणे हृदयस्थु
परि उगा असे निवांतु । तिये वेळी ( १ । १७७ ते ७९ )

'बोलून विचार करण्यापेक्षा विचार करुन बोलावे' या म्हणीप्रमाणे श्रीकृष्ण पूर्ण विचार करुनच प्रतिपादनाला सुरुवात करतात. श्रीकृष्ण थोडावेळ स्तब्ध राहतात.श्रीकृष्णाचे क्षणभर थांबणे व मौन पाळणे हे त्यांच्या विवेकी

मनाचे द्योतक आहे. अर्जुनाच्या मानसिक परिस्थितीचा व त्याच्या बुध्दीचा अंदाज घेऊनच श्रीकृष्ण विषय प्रतिपादनाला सुरूवात करतात.

श्रीकृष्णाचे स्तुतीचातुर्य --

ज्ञानेश्वरीतील श्रीकृष्ण अर्जुनाच्या पराक्रमाचे मुक्तकंठाने कौतुक करतो. गीतेतील श्रीकृष्ण अर्जुनाच्या पराक्रमाचा आवश्यक तेवढाच उल्लेख करतो. ज्ञानदेवांचा श्रीकृष्ण प्रेमाने आपुलकीने ,कौतुकाने अर्जुनास युध्दास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करीत आहे. श्रीकृष्ण अर्जुनाला सुरुवातीलाच गहन असा तत्वबोध करीत नाहीत ते अर्जुनाची स्तुती करतात ,अर्जुनाची स्तुती करण्यामध्येही कृष्णाचे स्तुती-चातुर्य आहे ते ज्ञानदेवानी टिपलेले आहे. अर्जुनाच्या पूर्व पराक्रमाची स्तुती केल्याने अर्जुनास युध्द करण्याची प्रेरणा येईल. युध्द करण्याची प्रेरणा आली नाही तरी युध्दभूमी सोडण्यापूर्वी युध्दभूमी सोडल्याने कोणाकोणत्या परिणामाला सामोरे जावे लागेल हा विचार तर मनात येईल ही श्रीकृष्णाची रास्त अपेक्षा आहे.

श्रीकृष्ण प्रेरणादायी आणि विचार प्रवर्तक अशी स्तुती करतात.अर्जुना तू अजिंक्य असा योध्दा आहेस. युध्दामध्ये तुझी कोणाबरोबरही तुलना होत नाही असा तू अतुलनीय योध्दा आहेस. तुझा पुरूषार्थ आणि पराक्रम सर्व योध्दांना मान्य आहे. गरूडाला पाहताच सर्प भितात व सिंहाला पाहताच हत्ती गांगरतात. तद्वत सर्व योध्दे तुला पाहताच भितात व गांगरतात [illegible] तू दयाळू अंत:करणाने या युध्दातून माघारी फिरलास तर कौरवादी दुष्टबुध्दीचे तुझे स्वजन तुला जिवंत सोडणार नाहीत. यदाकदाचित जिवंत राहिलास तर तुझे जगणे मृतप्राय: होईल कारण द्रौपदीचे वस्त्राहरण, लक्षागृह,वनवास,अज्ञातवास व श्रीकृष्ण शिष्टाईतील श्रीकृष्णाचा अपमान,तुमचा दुर्योधनाने नाकारलेला न्याय हक्क तुला जिवंत राहू देणार नाही. कौरव पुनश्च सिंहासनावर विराजमान झाल्यावर तुमची व द्रौपदीची काय अवस्था करुन सोडतील याची कल्पना करवत नाही, यामुळे जगणे मरणापेक्षा भयंकर होऊन

आत्महत्येशिवाय पर्याय राहणार नाही. तेव्हा युध्द हे अपरिहार्य आहे. कौरवांनी तुमच्या न्याय हक्कावर अतिक्रमण केलेले आहे हे अतिक्रमण काढून टाकण्यासाठी व धर्म संस्थापनासाठी युध्द करायलाच हवे. रणांगणावर शत्रूला पाट न दाखविणारा अर्जुन जर आज पाट दाखवून पळून गेला तर फार मोठा अनर्थ होईल. शत्रूला पाट दाखवून पळून जाण्यापेक्षा शत्रूला सामोरे जाऊन शत्रूला मारता मारता मरण्यात शूराविरांचा गैारव आहे.

युध्दातून पळून गेल्यास अर्जुन भिऊन पळून गेला असे कौरव म्हणतील व तुझी निंदा करतील त्या ऐवजी युध्द करुन विजय मिळव आणि राज्यसुख भोग.

हे म्हणती गेला वे गेला। अर्जुन आम्हा बिहाला।
हा सांगे बोलु उरला। निका कायी ?
मग ते वेळी हिये फुटावे। आता लाठेपणे का न झुंजावे।
हे जितले तरी भोगावे महीतळ ( २ । २०८, १९ )

अर्जुनाच्या पराक्रमाचे कौतुक करुन युध्दाची अपरिहार्यता पटवून देऊन युध्दाच्या परिणामाची स्पष्ट कल्पना देणारे श्रीकृष्णाचे व्यक्तिचित्र ज्ञानदेवांनी चित्रित केल्याने श्रीकृष्णाचे व्यक्तिचित्र सजग बनले आहे.

स्वधर्माचरण करणारा श्रीकृष्ण --

श्रीकृष्णाच्या जीवन चरित्राचा जवळून अभ्यास केल्यास असे निदर्शनास येते की श्रीकृष्णाच्या वाटयाला जी जी कर्मे आली त्याचा स्वीकार श्रीकृष्णाने केलेला आहे. बालक्रीडा, गुरुसेवा, वैवाहिक जीवनातील सारे सोपस्कार कृष्णाने केलेले आहेत. प्रसंगी युध्द करण्याची वेळ पडल्यास युध्द केलेले आहे. जन्मापासून तहत निजधामाला जाईपर्यन्त कृष्णाने स्वधर्माचेच पालन केलेले आहे. आपण अवतरी पुरुष आहोत, साक्षात भगवान योगेश्वर आहोत तेव्हा सर्वसामान्यासारखे का वागावे ? असा प्रश्नही कृष्णाला पडलेला नाही.

स्वधर्माचा नेमका अर्थ न कळल्याने अर्जुन युध्द न करण्याचा निर्णय घेतो. युध्द टाळल्याने मनास सुख, शांतता लाभेल, कोणतेही पाप होणार नाही अशी अर्जुनाची समजूत असते. अर्जुनाने ही चुक दुरुस्त करावी म्हणून श्रीकृष्णाने स्वधर्माचरणाचे महत्व स्वत:च्या उदाहरणातून पटवून दिलेले आहे. स्वधर्माचे आचरण करुन जगाला सन्मार्गाला लावणारा श्रीकृष्ण ज्ञानदेवांनी चित्रित केलेला आहे. जगताचा निर्माता व तारणकर्ता कोणत्याही गोष्टीची कमतरता नसणारा असा परिपूर्ण योगेश्वरही स्वधर्माचरण करतो असे चित्र ज्ञानदेवांनी उभे करुन श्रीकृष्णाचे लौकिक व्यक्तिमत्व साकार केले.

आता आणिकाचिया गोठी । कायशा सांगो किरीटी ।
देखें मीच इथे राहाटी । वर्तत असे
मृतगुरुपुत्र आणिला । तो तुवा पवाडु देखिला ।
तोही मी उगला । कर्मी वर्ते ( ३ । १६० ते ६३ )

मृतगुरुपुत्र जीवंतस्वरूपात आणून देण्याचे सामर्थ्य ज्या कृष्णाच्या ठिकाणी आहे तो श्रीकृष्ण स्वधर्माचे पालन विनशर्त करतो तेव्हा युध्द करणे ज्याचा धर्म आहे त्या अर्जुनाने क्षात्रियधर्माचे पालन का करु नये ? असा प्रश्नही सूचकपणे निर्माण केलेला आहे. ज्ञानदेवांनी कृष्णाचे सामान्नीकरण केल्याने आपला कृष्णाशी जवळचा संबंध प्रस्थापित होतो. गीतेतील कृष्ण अपुरा, थिटा वाटतो तर ज्ञानदेवीत कृष्ण विस्तृत व्यापक असा विशाल होत जातो. हाच तो ज्ञानदेवांच्या नवोन्मेषशाली प्रतिभेचा आविष्कार.

श्रीकृष्णाचे मित्रप्रेम --

श्रीकृष्णाचे वर्णन कपटनाटकी सूत्रधार असेही केलेले आहे. श्रीकृष्णाने जे कपट नाटक केलेले आहे ते दुष्टलोकांविरुध्दच केलेले आहे. दुष्ट लोकांना धडा शिकवून कृष्णाने लोकांचेच कल्याण केलेले आहे. श्रीकृष्णाच्या निष्कपट व्यक्तिमत्वाचे दर्शन त्याच्या मित्रप्रेमामध्ये होते. आपल्या मित्राचा श्रीकृष्णाने कधी विश्वास घात

केलेला नाही. संकटात सापडलेल्या मित्राला संकटातून मुक्त करण्यासाठी श्रीकृष्ण कधी धावलाच नाही असे त्याच्या चरित्रात झालेली नाही. इंद्रक्रोधाने प्रलयरूपी पडणाऱ्या मेघवृष्टीपासून गोकुळवासियांच्या संरक्षणासाठी गोवर्धन उचलला, लाक्षागृहापासून तहत पांडवांचा कुलदीपक परीक्षित याच्या जन्मापर्यन्त कृष्ण पांडवांच्या मदतीला धावून आलेला आहे. सुदाम्यासारख्या गरीब मित्राच्या जीवनात आनंदाचा सुकाळु केला. ज्यांनी श्रीकृष्णावर अतोनात प्रेम केले त्यांच्यावरही श्रीकृष्णाने अमर्याद प्रेम केले असा मित्रप्रेमाने भारवलेला कृष्ण ज्ञानदेवांनी ज्ञानदेवीतही चित्रित केलेला आहे.

' संकटकाळी जो मदत करतो तो खरा मित्र' असे एक सुभाषित आहे. पांडवाच्या जीवनात जेव्हा जेव्हा संकटे निर्माण झाली तेव्हा तेव्हा कृष्णाने त्यांना संकटातून सहीसलामत बाहेर काढलेले आहे. संकटकाळात मदत करणारा मित्र मिळेल परंतु आपल्या हृदयातील गुप्त गोष्ट आपल्या मित्राला सांगून मित्राला तात्काळ आपणासारखा करणारा श्रीकृष्णासारखा मित्र अजून तरी कोणाला मिळालेला नाही.

श्रीकृष्णाचे अर्जुनावर अत्यंतिक प्रेम असल्याने आत्मज्ञानाच्याबाबतीत अर्जुन अज्ञानी आहे हे जाणून त्याचे अज्ञाननष्ट करण्यासाठी श्रीकृष्ण आपल्या अंत:करणातील गुप्त गोष्ट सांगतात. अर्जुनाची अशी शंका असते की श्रीकृष्ण आमच्याबरोबरीचा आणि सूर्य अनादीकालापासूनचा तेव्हा याने सूर्याला आत्मबोध केला कधी ? तेव्हा श्रीकृष्ण सांगतात 'अर्जुना तुला पूर्वजन्म आठवत नाहीत परंतु मला पूर्वजन्माचे स्मरण होते. माझ्यापूर्वीच्या जन्मामध्ये मी सूर्याला हा योग सांगितलेला आहे ?' अर्थात श्रीकृष्ण जन्मरहित आहे परंतु सर्वसामान्य म्हणून जन्माला आलेल्याना पूर्व जन्म असतात असे आपले धर्मशास्त्र सांगते मग श्रीकृष्ण याला कसे अपवाद ? पूर्वजन्माविषयीचा प्रवाद अवास्तव आहे. परंतु आज देखील काही जनांना आपले पूर्वजन्म आठवतात. तेव्हा श्रीकृष्णाला पूर्वजन्माचे अलौकिक ज्ञान असावे. सर्वसामान्य परंतु विशेषज्ञानी या स्वरूपात श्रीकृष्ण या ठिकाणी पहावयास मिळतो.

श्रीकृष्णाचे अर्जुनावर अत्यंतिक प्रेम आहे यापेक्षा वेगळे वर्णन या प्रेमाचे करता

येत नाही. या प्रेमापोटीच श्रीकृष्ण आपले विशेष ज्ञान अर्जुनाला ऐकवत आहे. आपल्या मित्राचे वर्णन श्रीकृष्ण करतात ---

तू प्रेमाचा पुतळा । भक्तीचा जिव्हाळा ।
मैत्रियेची चित्कळा । धनुर्धरा ( ४ । २९ )

श्रीकृष्ण हा अर्जुनाचा विश्वासू मित्र आहे. श्रीकृष्णावर अर्जुनाचा पूर्ण विश्वास आहे. मैत्रीतील विश्वासहैता जोपासन्याचा प्रयत्न दोघेही करतात. या विश्वासाच्या बळावरच आपला मोह निवारावा अशी विनंती अर्जुन करतो. विश्वासहैतेलाही स्नेहाची जोड असल्याने जन्मरहित परमात्मा सर्वेश्वर श्रीकृष्ण आपल्या जन्माचे व अवतार कार्याचे रहस्य अर्जुनासमोर उलगडून दाखवितो. आपले अंत:करण खुले करुन निराश झालेल्या मित्राला फुलवणारा एखादाच श्रीकृष्णासारखा मित्र भेटतो. अशा वीरमित्राचे मनोज्ञ असे चित्रण ज्ञानदेवांनी करून कृष्णाची व्यक्तिरेखा आकर्षक केलेली आहे. श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या मित्र संबंधाचे काव्यात्मक असे चित्रण ज्ञानदेवांनी केल्याने या व्यक्तिरेखा वाचनीय झालेल्या आहेत.

भक्तवत्सल श्रीकृष्ण --

जे भक्त श्रीकृष्णाची अनन्य भावाने भक्ती करतात त्या भक्तांविषयी श्रीकृष्णाच्या मनात अत्यंतिक आदरभाव आहे अशा भक्तांच्या संरक्षणासाठी तो अवतारही धारण करतो. श्रीकृष्णाच्या या परमेश्वरी रूपाचे चित्रण ज्ञानदेवांनी भक्तियोगाच्या संदर्भात केलेले आहे. देवाचे अनेक आवडते भक्त आहेत परंतु या सर्वांमध्ये अर्जुना हा आवडता भक्त आहे. देव व भक्त यांच्या नात्याचे दर्शन या ठिकाणी घडते. कृष्णाच अर्जुनाला सांगतात की --

तैसे आस्थेच्या महापुरी । रिघताती कोटिवरी ।
परी प्राप्तीच्या पैलतीरी । विपाइल निगे ।।
म्हणौनि सामान्य गा नोहे । हे सांगता वडिल गोठी आहे ।
परी ते बोलो येईल पाहे । आता प्रस्तुत ऐक (७। १३ -- १४ )

श्रीकृष्ण व अर्जुन यांच्यातील देव-भक्त या नात्याचे चित्रण बाराव्या अध्यायातही घडते. भक्ताला देवाबद्दल जेवढे प्रेम वाटते त्यापेक्षाही जास्त प्रेम देवाला वाटते. श्रध्दावान भक्ताचा योगक्षेम चालविण्याची हमी देव घेतो. श्रध्दावान भक्ताला देव नमस्कार करतो, त्याचा लत्ताप्रहार सहन करतो.

म्हणौनि गा नमस्कारू । तयाते आम्ही माथा मुगुट करू ।
तयाची टाच धरू । हृदयी आम्ही ( १२ । २२१ )

प्रेम म्हणजे काय ? अतिउच्चत्तम प्रेमाचे स्वरूप काय असते ? याचे दर्शन अर्जुन व श्रीकृष्ण यांच्यातील परस्पर प्रेमाने दर्शविलेले आहे. आवडत्या व्यक्ती - विषयी श्रीकृष्ण मुखातून ज्ञानेश्वर म्हणतात --

तरी पढियंताची कहाणी । हे मुक्तीची मारणी ।
इये तव न बोलणी । परी बोलवी श्रध्दा ।।
म्हणौनि गा पंडुसुता । तू प्रियु आणि तूचि श्रोता ।
वरी प्रियाची वार्ता । प्रसंगे आली ( १२ । १५८, १६२ )

देवाला आवडणाऱ्या भक्ताचे वर्णन करून ज्ञानेश्वर थांबत नाही तर देवाला आवडणारा अर्जुनासारखा एखादा भक्त प्राप्त झाल्यानंतर कृष्णाला जो आनंद होतो त्याचे चित्रमय वर्णन ज्ञानेश्वर करतात --

तरि आता बोलो । भले या सुखा मीनलो ।
ऐसे म्हणत हेवो डोलो । लागला देवो ( १२ । १६३ )

प्रेमाचा अनुवाद करता येत नाही परंतु अर्जुनासारखा आवडता भक्त व श्रेष्ठतम दर्जाचा श्रोता मिळाल्याने श्रीकृष्णाच्या प्रेमळवाणीला पूर येतो व आनंदाच्या भरात श्रीकृष्ण डोलायला लागतात.

श्रीकृष्णाचा वक्तृत्व गुण --

एकाग्र चित्ताने कृष्णाचे भाषण ऐकणारा अर्जुनासारखा श्रोता मिळाल्याने श्रीकृष्णाच्या वक्तृत्वाला बहर आलेला आहे. श्रीकृष्णाच्या ठिकाणी जो वक्तृत्व गुण आहे त्याचे चित्रण ज्ञानदेवानी ज्ञानदेवीत केलेले आहे. श्रीकृष्ण अर्जुनासमोर वक्तृत्व करीत आहे असे गृहित धरुनच ज्ञानदेवांनी श्रीकृष्णाचे व्यक्तिचित्र रेखाटलेले आहे. श्रीकृष्णमुखातून ज्ञानदेव म्हणतात --

पै परिसतु आहासि निकियापरी । तेचि वक्तृत्वा व-हाडिक करी ।
ऐसे पुरस्करोनी श्रीहरी । आदरिले बोलो । ९ । २३८ )

आता पर्यन्त तू जसे लक्षापूर्वक ऐकत आहेस तशाच ऐकण्याची तू आमच्या वक्तृत्वाला मेजवानी कर.

बोलण्याची हौस आहे म्हणून कृष्ण अर्जुनासमोर भाषणबाजी करीत नाही. श्रीकृष्ण हा चतुरवक्ता आहे हे ज्ञानदेवानी टिपलेले आहे. महाभारतात अनेक भूमिका उभ्या करणाऱ्या श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्वातील चतुराई ज्ञानदेवाना ज्ञात आहे. श्रीकृष्णाचे चातुर्य ज्ञानेश्वर श्रीकृष्णाच्या वक्तृत्वातून दर्शवितात --

आम्ही मागील जे निरूपण केले । ते तुझे अवधानचि पाहिले ।
तव टाचे नव्हे भले । पुरते आहे
घटी थोडेसे उदक घालिजे । तेणे न गळे तरी वरिता भरिजे ।
ऐसा परिसोनि पाहिलासि तव परिसविजे । ऐसेचि होतसे ।।
ऐसे अर्जुना येउते सर्वेश्वरे । पाहोनि बोलिले अत्यादरे ।
गिरी देखोनि सुभरे । मेघु जैसा ( १० । ५०,५१,५३ )

मडक्यात थोडे पाणी ओतून पहावे व ते गळले नाही तर ते मडके भरावे याप्रमाणे कृष्णाने अर्जुनासमोर थोडेसे भाषण केले अर्जुनाला ते समजले हे लक्षात येताच आणखी सांगायला सुरूवात करतो.

अर्जुनाच्या हितासाठी श्रीकृष्णाने भाषणाला सुरुवात केलेली आहे.तरीही अर्जुनाचे हित या भाषणामध्ये आहे म्हणून कृष्ण भाषण करीत नसून अर्जुनाने अवधानरूपी चारा श्रीकृष्णाला दिलेला असल्याने श्रीकृष्णरूपी मेघ बरसत आहे असे गीतेपेक्षा निराळे श्रीकृष्णाचे चित्रण ज्ञानदेवानी केलेले आहे. श्रीकृष्णाने अर्जुनाला आपली सर्व गुपिते सांगितलेली आहेत कारण अर्जुनश्रध्दापूर्वक श्रवण करुन श्रीकृष्णाने सांगितलेल्या मताचा आदर करणारा श्रोता आहे. हे सारे ऐकून अर्जुनाचे हित होणार आहे की अहित होणार आहे हा भाग नंतरचा आहे.

तरी परियेसी गा प्रज्ञा । तू आस्थेचीच संज्ञा ।
बोलिलिये गोष्टीची अवज्ञा । नेणसी कव्हा ।।
यालागी सुमनु आणि शुध्दमती । जो अनिंदकु अनन्य गती ।
पै गा गौप्यही परी तयाप्रती । चावळिजे सुखे ( ९ । ३६, ४० )

चांगल्या मनाचा व शुध्द बुध्दीचा,तसेच निंदा न करणारा व अनन्यगतिक असा श्रोता जर मिळाला तर त्याला गुप्त गोष्ट जरी असली,तरी ती आनंदाने सांगावी अशी स्पष्ट कबूली श्रीकृष्णमुखातून ज्ञानदेवानी दिलेली आहे.

श्रीकृष्णाचे परमेश्वरी सामर्थ्य --

श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्वातील परमेश्वरी सामर्थ्याचे चित्रण ज्ञानदेवानी परमेश्वरी थाटातच केलेले आहे. नवव्या अध्यायात श्रीकृष्णानी आपल्या परमेश्वरी शक्तीची व आपल्या ऐश्वर्याची ओळख अर्जुनाला करुन दिलेली आहे. या जगात मी वाचून गोष्टी नाही. या जगताचा नियंता मी असून काय निर्माण करायचे आणि काय मोडायचे हे सर्व माझ्या इच्छेवर आवलंबून आहे हे पार्थिव जगत माझ्या आधीन आहे या जगातील झाडाची पाने सुध्दा माझ्या इच्छेशिवाय हालत नाहीत

म्या बोलविल्या वेदु बोले । म्या चालविल्या सूर्यु चाले ।
म्या हालविल्या प्राणु हाले । जो जगाते चाळिता ।।
जो ऐसा समर्थु । तो मी जगाचा नाथु ।

आणि गगना ऐसा साक्षिभूतु । तोही मीचि ।।
मीचि गा पांडवा । या त्रिभुवनासि वोलावा ।
सृष्टिक्षय प्रभवा । मूळ ते मी ( ९ । २८३,२८५,२९१ )

म्हणून अर्जुना --

तू मन हे मीचि करी । माझिया भजनी प्रेम धरी ।
सर्वत्र नमस्कारी । मज एकाते ( ९ । ५१७ )

' माझी जर प्राप्ती करुन घ्यावयाची असेल तर देहाचा अभिमान गळायला हवा ' मी ' आणि ' माझी ' आठवण बुझायला हवी, सर्व गर्वाचे निर्दालन करुन जो अनन्यभावाने जे काय अर्पण करील ते मला समर्पित होते. भक्तिभावानेच मी प्राप्त होतो अन्य सर्व मला त्याज्य आहे मी भावाचा भुकेला आहे, अर्जुना तू फक्त मला अनन्यभावाने शरण ये '.

ज्ञानदेवांनी श्रीकृष्णाचे परमेश्वरी सामर्थ्य सांगून मानवरूपातील श्रीकृष्णाच्या महानतेची जाणीव ज्ञानदेव करुन देतात.

<u>श्रीकृष्णाचे निरूपाधिक रूपावरीलप्रेम</u> --

श्रीकृष्णाचे निरूपाधिक म्हणजे निर्गुण निराकार अशा मूळ रूपावर अत्यंतिक प्रेम आहे.श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात की ' सगुणरूप ' हे माझे खरे रूप ' नाही.भक्ताच्या कल्याणासाठी ते रूप धारण करुन भक्तांना मी माझ्या निरूपाधिक स्वरूपाशी एकरूप करतो.तेव्हा निर्गुण निरूपाधिक असे जे माझे स्वरूप आहे ते माझे खरे रूप आहे. तेव्हा अर्जुना तू माझ्या सगुणरूपाचा आग्रह सोड व माझ्या निरूपाधिक स्वरूपावर नितांत प्रेम कर '.

पंधराव्या अध्यायात अर्जुन देवाला विनंती करतो की तुमच्या निरूपाधिक स्वरूपाचे वर्णन नव्याने एकवेळ ऐकावयाचे आहे. ते सांगा , अर्जुनाच्या या विनंतीने श्रीकृष्णाला फार आनंद होतो कारण या निरूपाधिक स्वरूपाविषयी चर्चा

HAPUR

करावयास कोण मिळतच नाही. तेव्हा अर्जुनासारखा सर्वांगाचे कान करुन ऐकणारा श्रोता मिळाल्याने श्रीकृष्णाला खूप आनंद होतो.

आजि मनोरथासि फळ । जोडलासि तू केवळ ।
जे तोंड मरूनि निखळ । आलासि पुसा
जे अद्वैताहीवरी भोगिजे । ते अनुभवीय तू विरजे ।
पुसोनि मज माझे । देवासि सुख
जैसा आरिसा आलिया जवळा । दिसे आपण मे आपला डोळी ।
तैसा संवादियानिर्मळा । शिरोमणी ( १५ । ४४९ ते ५१ )

अर्जुनासारखा श्रोता लाभल्याने श्रीकृष्णाला आनंद होऊन तो अलिंगन देतो असे चित्रात्मक वर्णन करुन ज्ञानदेवांनी श्रीकृष्णाची व्यक्तीरेखा जीवंत केलेली आहे. `निरूपाधिक स्वरूपाविषयी चर्चा म्हणजे अद्वैत प्राप्तीच्या सुखाचा तो एक भोग आहे .शुध्द स्वरूप परमात्म्याविषयी चर्चा करण्यात अर्जुना तू श्रेष्ठ आहेत.अर्जुना तू विचारणा करणारा भेटलास हे माझे भाग्य समजतो. तुझ्या प्रश्नाचे उत्तर म्हणून मी हे सांगत नाही, तर त्यामुळे माझ्या सुखरूपतेचा आनंद मला मिळणार आहे असे म्हणून देवाने अर्जुनाला अलिंगन दिले.`

## आनंदाने उंचबळणारे कृष्ण --

गीतेमध्ये श्रीकृष्ण आनंदाने उंचबळून येत नाही. ज्ञानेश्वरीत मात्र आनंदाने उंचबळणाऱ्या श्रीकृष्णाचे चित्रण ज्ञानदेवांनी केल्याने ज्ञानेश्वरीतील कृष्णाची व्यक्तिरेखा अधिक सजक,रसरसीत वाटते. अर्जुनाच्या अंत:करणपूर्वक केल्या जाणाऱ्या श्रवणावर व अर्जुनाने श्रीकृष्णाविषयी दाखविलेल्या मन:पूर्वक प्रेमामुळे श्रीकृष्ण गहिंवरुन येतात. एकाकी श्रीकृष्णाला खूप आनंद होतो व अर्जुनाला पोटाशी धरुनच स्वत:च्या मनाशीच म्हणतात --

` जाले इक्षुरसाचे ढाळ । तरी लवण देणे किडाळ ।
जे संवादसुखाचे रसाळ । ना सैल थिते ।
आधिच आम्हा ययां काही । नरनारायणासी भिन्न नाही
परी आता जिरो माझ्या ठाई । वेगु हा माझा (१५ ।४५७-५८ )

आनंदाने उंचबळणारे कृष्ण संवादसुख मोडू नये म्हणून उंचबळणारा आनंद समर्थपणे जिरवतात .श्रीकृष्णाने आनंदाने अर्जुनाला अलिंगन दिले असे मोगम चित्रण न करता ज्ञानेश्वर म्हणतात --

ऐसा बोलत देवोभुलला मोहे । अर्जुनाते आलिंगूनि ठाये ।
मग बिहाला म्हणे नोहे । आवडी हे ( १५ । ४५५ )

असे बोलणे चालू असता स्नेहाने मोहित होऊन गहिंवरुन देवानी अर्जुनाला पोटाशी धरुन तसेच खाली बसावे व थोड्याच वेळात वृत्तीवर येऊन स्वत:शीच म्हणाले, हा प्रसंगी इतका मोह कामाचा नाही.

आदर्श गुरू श्रीकृष्ण --

श्रीकृष्ण एक आदर्श गुरू होते. आजच्या बदलेल्या परिस्थितीत श्रीकृष्ण एक आदर्श शिक्षक होते. आदर्श शिक्षकाच्या अंगी असाव्या लागणाऱ्या गुण - वैशिष्टयाचे दर्शन ज्ञानदेवीत श्रीकृष्णाच्या व्यक्तिरेखेत घडते. श्रीकृष्ण आदर्श शिक्षक व आदर्श उपदेशक या भूमिकेत चित्रित झालेले आहेत. उपदेशाचे डोस देणाऱ्या व्यक्तींची संख्या दिवसागणिक वाढत आहे. कोरडा उपदेश करुन खोटी प्रतिष्ठा निर्माण करणाऱ्या उपदेशकांचा सुकाळ होत आहे. चुकीचा उपदेश करुन दुसऱ्यांच्या जीवनाशी आणि भावनां शी खेळणारीही कमी नाहीत.उपदेशकांमध्ये प्रेमाचा ओलावा व अंतर्यामी तळमळ,चारित्र्याचा अभाव असल्याने आजचे उपदेश आणि नीतीबोध चेष्टाचे विषय ठरत आहेत. गुरू व शिष्य यांच्यातील प्रेमाचा ओलावा आटल्याने गुरू व शिष्य ( शिक्षक व विद्यार्थी ) यांच्यातील दरी दुरावत आहे. एकूणच चित्र विनाशाकडे झुकले. समयी ज्ञानेश्वरीतील श्रीकृष्णार्जुनाची गुरू - शिष्याची जोडी सुधारणेचा सुपंथ दर्शवित आहे हे संजयाच्या कथनातून ज्ञानेश्वरांनी जाणवून दिले आहे.

अर्जुनाने विश्वरूप बघण्याची इच्छा प्रदर्शित करताच विश्वरूप दाखविले. विश्वरूप नको आता सगुणरूप हवे म्हणताच श्रीकृष्णाने सगुणरूप धारण केले.

श्रीकृष्णाच्या या कृतीचे ज्ञानदेवांनी सुंदर वर्णन केलेले आहे . भगवंतानी अर्जुनास उपदेशाचा शेलका वाटा जे विश्वरूप ते दाखविले यावरून आपल्या शिष्यावर गुरूचे किती पराकाष्ठेचे प्रेम असते ते दिसून येते --

मोडोनि मांगाराचा रवा । लेणे घडिले आपलिया सवा ।
मग न्नावडे जरी जीवा । तरी आटिजे पुढती ।।
तैसे शिष्याचिये प्रीति जाहले । कृष्णत्व होते ते विश्वरूप केले ।
ते मना नयोचि मग आणिले । कृष्णपण मागुते । (११ । ६४४ -- ४५ )

ज्ञानेश्वरीतील श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्वामध्ये आदर्श शिक्षकाचे दर्शन घडते याचे संशोधनात्मक असे विवेचन डॉ.चं.द.इंदापूरकर यांनी " ज्ञानेश्वरी : शैक्षणिक विचारांचा महान आधार ग्रंथ " या लेखात केलेले आहे. श्रीकृष्ण हे आपल्या विद्यार्थ्यावर म्हणजे अर्जुनावर अपरिमित प्रेम करीत होते. अर्जुनाची बुध्दी पाहूनच त्यानुरूप अध्यापन केलेले आहे. अर्जुनाची स्तुती करून श्रीकृष्णाने अर्जुनाचा आत्मसम्मान केलेला आहे. आत्मविश्वास वाढविलेला आहे. शिक्षक म्हणून श्रीकृष्ण परिपूर्ण ज्ञानी होते. इत्यादी श्रीकृष्णाच्या अध्यापनातील वैशिष्ट्य त्यांनी सांगितलेली आहेत. डॉ.इंदापूरकर म्हणतात" शिक्षकाचे चारित्र्य उज्ज्वल नसेल तर त्याची प्रतिमा ख-या अर्थाने उज्ज्वल होऊच शकणार नाही. आपण सदाचरण करावे व लोकांसमोर योग्य तो आदर्श उभा करावा ही धारणा श्रीकृष्णाची होती, त्यामुळे परमात्मा असला तरी इहलोकात जन्म घेतल्याने ज्या काही जबाबदा-या पडतात त्या डावलण्याची श्रीकृष्णाची इच्छा नव्हती म्हणून तो म्हणतो --

इही आमुची वास पाहावी । मग वर्तती परी जाणावी ।
ते लौकिक स्थिती आघवी । नासिली होईल ।।
म्हणोनि समर्थु जो थे । आथिला सर्वज्ञतें
तेणे सविशेषे कर्माते । जावे ना"( ३ । १६७ -- ६८ )[२]

श्रीकृष्ण हा एक आदर्श शिक्षक होते व त्यांचे गुण अनुकरणीय आहेत.

आजच्या शिक्षकांसमोर श्रीकृष्ण एक आदर्श आहे. ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्वातील आदर्श शिक्षक आणि आदर्श उपदेशक ज्ञानेश्वरीतील श्रीकृष्णाच्या रूपाने चित्रित झालेला आहे.

भावविवश श्रीकृष्ण --

ज्ञानदेवांनी गीतेतील कृष्णा-अर्जुन संवादाचा फक्त भावानुवाद केलेला नाही. प्रसंगानुरूप भावविवश कृष्ण चित्रात्मकपध्दतीने चित्रित करुन श्रीकृष्णाच्या व्यक्ति चित्रातील भावभावनांचे कल्लोळ टिपून काढलेले आहेत. यामुळे गीतेतील श्रीकृष्णा पेक्षा ज्ञानदेवीतील कृष्ण मनाला अधिक भावतो. श्रीकृष्णाच्या भावविश्वातील परमोच्च, उत्कट असा क्षण ज्ञानदेवांनी अचूक टिपलेला आहे" अर्जुना तुझ्या इंद्रियांची वृत्ती माझ्याकडे वळव, तोंडाला नामसंकीर्तन, हातापायांना माझी सेवा करायला वळण लाव, जगतभासाची निवृत्ति करुन तू मदरूप हो मी जे काय सांगितलेले आहे ते खरे आहे तुझी शपथ घेऊन सांगतो . असे म्हणत श्रीकृष्णाने अर्जुनाला जे अलिंगन दिले त्याचे ज्ञानदेवानी चित्रात्मकपध्दतीने वर्णन करुन श्रीकृष्णार्जुनाची जोडी साक्षात शब्दाद्वारेच समोर उभी केली.

मग सावळा सर्वकण्णु । वाहु पसरोनि दक्षिणु ।
अलिंगला स्वशरणु । भक्तराजु तो"
न पवता जयाते । कारणे सूनि बुध्दिते ।
बोलणे मागौते । वोसरले "
ऐसे जे काही एक । बोलो बुध्दीसिही अटक ।
ते धावया मिख । खेवाचे केले ।।
हृदया हृदय एक जाले । ये हृदयीचे ते हृदयी घातले"
द्वैत न मोडिता केले । आपणा ऐसे अर्जुना ।।
दीपे दीपु लाविला । तैसा परिष्वंगु तो जाला ।
द्वैत न मोडता केला । आपणप पार्थु "
तेव्हा सुखाया मग तया । पूर आला जो धनंजया ।

तेथ वाहु त-ही बुडोनिया । ठेला देवो ।।
सिंधु सिंधुते पावो जाये । ते पावणे ठाके दुणा होये ।
वरी रिगे पुरणिये । आकशाही
तैसे तया दोघांचे मिळणे । दोघा नावरे जाणावे कवणे ।
किंबहुना श्रीनारायणे । विश्व कोंदले ( १८ । १४६८ ते ९५ )

अर्जुना तू मला शरण ये असे श्रीकृष्ण म्हणाले नंतर त्यांनी काय कृती केली यांचे ज्ञानदेवांनी चित्रात्मक परंतु भावपूर्ण असे वर्णन केलेले आहे. मग श्यामसुंदर भगवंतानी आपला कंकणयुक्त उजवा हात ( उजवा हात कारण डाव्या हातात घोड्याची लगाम आहे ) पुढे करुन आपल्या अनन्यशरण आलेल्या भक्तश्रेष्ठ अर्जुनाला अलिंगन दिले, ज्या वस्तूपर्यन्त पोचणे अशक्य आहे ,वाणी मनसह्वर्तमान परत फिरली व मौनावली. वाणीला व बुध्दीला अगम्य असे जे काही एक वस्तु ते स्वभक्ताला अर्पण करण्याकरिता कृष्णाने अलिंगनाचे निमित्त केले. हृदयाला हृदय मिळले हा अंत:करणातील त्या अंत:करणात साठविले व औपाधिक द्वैतभंग न करता अर्जुनाला स्वपदावर बसविले.

श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या संगमाचे ज्ञानदेवांनी केलेल्या वर्णनातून श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्वातील उत्कटता,आपले सर्वस्व समर्पित करण्याची हृदयाची विशालता, स्वपदावर शिष्याला बसवून नामानिराळा होण्याची संन्यस्तवृत्ती भावविवशता यांचे दर्शन घडते.

## समारोप --

इतिहासामध्ये आणि साहित्यामध्ये अनेक व्यक्तिरेखा रेखांकित केलेल्या आहेत परंतु या व्यक्तिरेखा कोणात्या ना कोणात्या स्वरूपात अपूर्णच आहेत.मानवी जीवनाच्या सर्व अंगाना स्पर्श करण्याचे सामर्थ्य या व्यक्तिरेखांमध्ये नाही. परंतु श्रीकृष्ण ही व्यक्तिरेखा संपूर्ण मानवी जीवनाला स्पर्श करुन ,सुखदु:खाची स्पंदने

भोगून, संस्कृतीची उपासना करीत सुखाचे व आनंदाचे आवार निर्माण करणाऱ्या महामानवाची व्यक्तिरेखा आहे.

श्रीकृष्णार्जुन यांच्या विविध नात्यासंबंधात भावभावनेचे रंग भरून श्रीकृष्ण या महामानवाची व्यक्तिरेखा ज्ञानदेवांनी चित्रित केलेली आहे. विविध नात्यासंबंधातूनी ही व्यक्तिरेखा आकारला येते, शेवटी सर्व नाती संपून जीवा - शिवाच्या मिलनाच्या परमोच्च बिंदूत या व्यक्तिरेखांचा शेवट केलेला आहे. हा महामानव अलौकिक असून ज्ञानेश्वरीत विविध नात्यासंबंधाने अभिव्यक्त झाल्याने आपण या व्यक्तिरेखेशी समरस होतो.

## संदर्भ


१ डॉ.चित्राव सिध्देश्वरशास्त्री, "प्राचीन चरित्रकोश" प्रथम खंड, १९३७, पृ.२६२-२७३

२ डॉ.इंदापूरकर चं.द., "महाराष्ट्र मराठी अध्यापक त्रैमासिक, ज्ञानेश्वरी, आणि शिक्षण विशेषांक," मधील "ज्ञानेश्वरी शैक्षणिक विचाराचा महान आधार ग्रंथ", हा लेख वर्ष १२, अंक १, सप्टेंबर, १९९२, पृ.१०.


12115
A